हॅलो प्रभात

# विवेकानंदमध्ये 'करिअर मार्गदर्शन' व्याख्यान संपन्न



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद कॉलेज येथे रोटरॅक्ट क्लब, आय.क्यु.ए.सी. व NCC विभागाच्या संयुक्त विद्यमाने युवकांसाठी 'करिअर मार्गदर्शन' विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

६ महाराष्ट्र गर्ल्स NCC, कोल्हापूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे यांनी विद्यार्थ्यांना करिअर निवड, शिस्त, नेतृत्व, देशसेवा व आत्मविश्वासाचे महत्त्व प्रभावीपणे सांगितले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.पी. थोरात अध्यक्षस्थानी होते. ग्रंथालय सभागृहात झालेला हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन व मार्गदर्शन आय. क्यु.ए.सी. प्रमुख डॉ. श्रूती जोशी, मेजर सुनिता भोसले व संबंधित विभागांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या करण्यात आले.

पुण्यनगरी ▮ सोमवार, १५ डिसेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये 'करिअर मार्गदर्शन'

**कोल्हापूर :** रोटरॅक्ट क्लब ऑफ विवेकानंद कॉलेज, आयक्यूएसी विभाग व कॉलेजच्या एनसीसी विभागाच्या सहकार्याने युवकांसाठी करिअर मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान पार पडले. यावेळी ६ महाराष्ट्र गर्ल्स एनसीसी कोल्हापूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे यांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम विवेकानंद महाविद्यालयाच्या ग्रंथालय सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी थोरात होते. कर्नल विक्रम नलवडे यांनी विद्यार्थ्यांना करिअर निवड, शिस्त, नेतृत्वगुण, देशसेवा तसेच आत्मविश्वासाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देत युवकांना योग्य दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरित केले. पाहुण्यांची ओळख कॅडेट सृष्टी पाटील व छावी यादव यांनी करून दिली. आभार लेफटनंट जे. आर. भरमगोंडा यांनी मानले. हा कार्यक्रम आयक्यूएसीप्रमुख डॉ. श्रुती जोशी, मेजर सुनीता भोसले, अबिद मणेर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी पार पडला. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा. एच. जी. पाटील, प्रा. के. जे. गुजर, क्लब मेंबर, विद्यार्थी-विद्यार्थिनी, एनसीसी कॅडेटस्, विवेकानंद अॅकॅडमीचे विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

तरुण भारत संवाद
सोमवार, १५ डिसेंबर २०२५

# जलसंपदा विभागात कालवा निरीक्षकपदी सावर्डेची प्रतीक्षा चौगले



सुळे : सावर्डे तर्फ असंडोली (ता. पन्हाळा) येथील प्रतीक्षा पंडीत चौगले हिची महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत घेण्यात आलेल्या सरळ सेवा परीक्षेतून जलसंपदा विभाग पुणे, कालवा निरीक्षकपदी निवड झाली. प्रतिक्षा ही सामान्य कुटूंबातील मुलगी असून तिचे वडील शेती करतात. तिला आई संगीता चौगले, वडील पंडीत चौगले यांचे पाठबळ मिळाले. तिने विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथून विज्ञान शाखेतून पदवी पूर्ण केली. त्यानंतर तिने स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. धर्मराज अभ्यासिका केंद्रात सराव करत अभ्यासात सातत्य ठेऊन तिने हे यश संपादन केले.